# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७, दुरध्वनी क्र.२८१०३४०९

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ८६ /२०२४-२५ दिनांक : २७/ ०५/२०२४

प्रति,
सिस्टम मॅनेजर,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय — संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**
**(धोकादायक व विकासकामात बाधित झाडे मुळासहित काढणेकामी)**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ८६ /२०२३-२४

दिनांक : २७/०५/२०२४

**// जाहीर नोटिस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाड काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाम | ३० ते ३५ फुट | ०१ | १० वर्ष | सदरचे झाड ओम शांती चौक,इंद्रलोक फेस -३ भाईंदर (पु) येथिल मौजे नवघर जुना सर्व्हे क्र.२२०,नविन सर्व्हे नं १९२,हिस्सा क्र.८ ह्या जागेवर ब्रिक होम्स एल.एल.पी या कंपनीने ब्लुवेल नावाची इमारत बांधून पुर्ण झालेली असून सदर इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारा समोर मनपा रस्त्यावरील मुख्य प्रवेशद्वाराच्या मधोमध झाड असून इमारतीत प्रवेश करण्यास व तसेच बाहेर पडण्यास मुख्यता वाहनांना अडथळा निर्माण होत आहे. तरी सदरील झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **ब्रिक वॉल होम्स एल.एल.पी यांचे दि.२३/०४/२०२४ रोजीचे पत्र.** |
| २ | कडुलिंब | ३० ते ३५ फुट | ०१ | १५ वर्ष | सदरचे कडुलिंबाचे झाड श्री मायकुल इग्नेशियस रोजारीओ, अर्जदार यांच्या घरावर धोकादायक रित्या वाकलेले आहे. सदर झाड जोऱ्याच्या वाऱ्याने केव्हाही पडुन जीवीत व वित्तहानी धोका संभवतो याकारणा स्तव तरी सदरील झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **श्री मायकुल इग्नेशियस रोजारीओ यांचा दि. १०/०४/२०२४ रोजीचा अर्ज** |
| | | एकूण | ०२ | | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबावत नागरिकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका